न्यूज लाईव्ह
# राजगड
सत्यता हीच आमची ओळख

दैनिक | वर्ष १ ले | अंक १ | मंगळवार, ९ एप्रिल २०२४ | मुल्य : ५ रु. | पाने : ४ | संपादक : वर्षा सोनवणे-गायकवाड | URN : UDYAM-MH-26-0239825 | Digital Edition






### दुर्गम डोंगरी भागातील मतदान केंद्रे 'रेंज'मध्ये आणणार

भोर : बारामती लोकसभा मतदारसंघातील सर्वांत मोठ्या असलेल्या भोर विधानसभा मतदारसंघात 'शेंडो' मतदानकेंद्रांसाठी प्रभावी यंत्रणा राववण्यात येणार आहे.त्यानुसार,महसूल विभागाच्या निवडणूक शाखेने 'ॲक्शन प्लॅन' तयार केला आहे.भोर मतदारसंघात भोर, राजगड (वेल्हे), मुळशी या तालुक्यांचा समावेश होतो. तिन्ही तालुक्यांत मोठ्या प्रमाणांवर दुर्गम, डोंगराळ प्रदेश आणि धरणक्षेत्र आहे.कित्येक गावे,वाड्या आणि वस्त्यांमध्ये मोबाइलला नेटवर्क नसल्यामुळे संपर्क साधणे कठीण झाले आहे. पान ३ वर

## राजगड न्यूज वृत्तपत्र आता तुमच्या हातात!

पुणे आणि सातारा जिल्ह्यातील लोकप्रिय डिजिटल न्यूज पोर्टल, राजगड न्यूज आता एका नवीन पाऊलावर पाऊल टाकत आहे. या शुभ पाडव्याच्या मुहूर्तावर, आम्ही राजगड न्यूज वृत्तपत्राचे डिजिटल एडिशन सादर करत आहोत!

आता तुम्हाला तुमच्या आवडीच्या बातम्या, ताज्या घडामोडी आणि स्थानिक माहिती मिळेल, तेही तुमच्या स्मार्टफोनवर किंवा संगणकावर! राजगड न्यूज वृत्तपत्राच्या डिजिटल एडिशनमध्ये तुम्हाला काय काय मिळेल ते पाहूया: राजगड न्यूज पोर्टलवरील सर्व ताज्या बातम्या,पुणे आणि सातारा जिल्ह्यातील स्थानिक बातम्या,राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि क्रीडा क्षेत्रातील बातम्या,विश्लेषणात्मक लेख आणि मुलाखती,मनोरंजन आणि जीवनशैलीवरील बातम्या आणि बरेच काही!

राजगड न्यूज वृत्तपत्राचे डिजिटल एडिशन वाचण्यासाठी तुम्हाला फक्त आमच्या वेबसाइटला भेट द्यावी लागेल किंवा आमच्या ॲप डाउनलोड करावे लागेल. तुम्ही आमच्या सोशल मीडिया पेजवरही फॉलो करू शकता आणि ताज्या बातम्या मिळवू शकता.

आम्हाला आशा आहे की तुम्हाला राजगड न्यूज वृत्तपत्राचे डिजिटल एडिशन आवडेल. तुमच्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

राजगड न्यूज वृत्तपत्र – तुमच्या हातात, तुमच्या जगात!

आम्हाला तुमच्या पाठिंब्याची गरज आहे!

राजगड न्यूज वृत्तपत्र हे तुमच्यासाठी, तुमच्या समुदायासाठी आहे. तुम्ही आमच्या वृत्तपत्राचे सदस्यत्व घेऊन आणि आमच्यासोबत जाहिरात देऊन आम्हाला पाठिंबा देऊ शकता.

राजगड न्यूज वृत्तपत्र – तुमच्या बरोबर, तुमच्यासाठी!

# शरद पवार म्हणाले, शेवटच्या श्वासापर्यंत तुमच्यासाठी लढणार

**पुणे :** अजित पवारांनी वेगळी चूल मांडल्यानंतर ८३ वर्षांचे शरद पवार नव्याने पक्ष उभारणी करत प्रचाराला लागले आहेत. ५६ वर्ष मी सुट्टी घेतली नाही, श्वासात श्वास असेपर्यंत तुमच्यासाठी काम करेल, असं शरद पवारांनी म्हटलं आहे.

काही लोक पक्ष सोडून गेले. पण, राष्ट्रवादी कुणी स्थापन केली, लोक कुणी निवडून आणले, मंत्रिपद कुणी दिली, असा सवाल शरद पवारांनी अजित पवारांवर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला आहे. बारामतीतील उंडवडी येथील कार्यक्रमात शरद पवारांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे.

शरद पवारांनी तुतारी फुंकली

भाषणा दरम्यान शरद पवारांनी सुप्रियांच्या लग्नाची गोष्ट, कान तुटलेल्या कपातून चहाचा किस्सा सांगितला. विकासाचे काम करून घेणे हा माझा स्वभाव असं म्हणत शरद पवारांनी पंतप्रधान मोदींवरही निशाणा साधला आहे. शरद पवार म्हणाले, गुजरात राज्याला कृषी मंत्री असताना प्रचंड मदत केली. मोदींना मला सांगितले की, मला बारामतीत यायचं आहे. ते इथं आले म्हणाले की, शरद पवारांनी मला शिकवलं.

**शरद पवारांचा अजित पवारांवर निशाणा**

शरद पवार यांनी अजित पवार यांच्यावर नाव न घेता टीका केली. तुम्ही विधानसभेला मतदान केलं, तर तुम्ही चुकीच्या रस्त्याला गेला. अधिक लोकांना संधी द्यायचा हा माझा हेतू. जनाई शिरसाईमध्ये लक्ष घालेन, पूर्ण कसं होत नाही बघतो. ज्यांच्यावर जबाबदारी दिली त्यांनी (अजित पवारांनी) काम केलं नाही, आता मी पूर्ण करेल कारण माणसं माझी आहेत, असं म्हणत अजित पवार यांचे नाव न घेता शरद पवारांनी त्यांना टोला लगावला आहे.

**कुणी बोललं की, कारवाई करण्याची पंतप्रधानांची भूमिका**

पंतप्रधानांनी आता वेगळी भूमिका घेतली, कुणी बोललं की, कारवाई करण्याची भूमिका त्यांनी घेतलीय. झारखंड, दिल्लीच्या मुख्यमंत्री यांना तुरुंगात टाकलं. ही काय लोकशाही आहे? ही हुकूमशाही आहे. हे चित्र बदललं नाही तर सत्ता मूठभर लोकांच्या हातात जाईल. जर तसे झालं तर, सत्ता भ्रष्ट होते, जास्त लोकांच्या हातात सत्ता जायला पाहिजे. ही निवडणूक मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी होतेय, असं सांगितलं जाते, पण राहुल गांधी इथे येणार आहेत की मोदी? देश पातळीवर योग्य काम कसे, होईल यासाठी ही निवडणूक आहे, असंही शरद पवारांनी म्हटलं आहे.



### माझ्यात श्वासात श्वास असेपर्यंत तुमच्यासाठी काम करेल

विरोधकांनी सांगितले ८४ वय झालं. माझं वय काढू नका, तुम्ही काय बघितलं आहे? मी थांबणार नाही. तुम्ही मला चार वेळा मुख्यमंत्री केलेलं नाही, कृषी मंत्री केलं नाही. मला ५६ वर्ष झाली, मला एक सुट्टी नाही. बैल पोळ्यालाही बैलाला एक दिवस सुट्टी देता, मला एकही दिवस सुट्टी दिलेली नाही. माझ्यात श्वासात श्वास असेपर्यंत तुमच्यासाठी काम करेल, अशी ग्वाही यावेळी शरद पवारांनी दिली आहे.

### तुटलेल्या चहाच्या कपाची कहाणी

इथे उद्योग आले,पण घर बदललं का? पहिल्यांदा चहा पितळीत मिळवायचा, परत कान तुटलेला कप आला. त्यानंतर परिस्थिती बदलली, पूर्वी किल्टन बसायला टाकायचे, आता राहणीमान बदललं आहे. त्याचे कारण इथे कामं झाली आहेत.

### सुप्रिया सुळेंच्या लग्नाचा किस्सा

शरद पवारांनी यावेळी मुलगी सुप्रिया सुळे यांच्या लग्नातील किस्सा सांगितला. सर्वांनी सुप्रिया यांचं लग्नकार्य आपल्या मुलीचं कार्य असल्याप्रकारे केलं असं शरद पवारांनी सांगितलं. यावेळी ते म्हणाले की, सुप्रियाचं लग्न झालं त्यावेळी सगळ्यांनी सुप्रियाच्या लग्नात येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत केलं, सुप्रिया माझी मुलगी आहे, असं सर्वांना वाटत होतं, हे कधी मी विसरू शकत नाही.

### तुतारी निशाणी अगदी लहान मुलांपर्यंत पोहोचलीय

तुतारी निशाणी सर्वत्र पोहचलेली दिसत आहे, असं पवारांनी सांगितलं. लोणावळ्यामधून येत होतो, त्यावेळी त्या घाटात ट्राफिक जाम झालं, त्यावेळी एक शाळेची बस उभे होती. पोलिसांनी माझी गाडी पुढे काढली आणि त्यानंतर मुलांनी माझ्याकडे बघितलं आणि हाताने तुतारी चिन्ह केलं. त्यावरून लक्षात येते की, लहान मुलांपर्यंत चिन्ह पोहोचलं म्हणजे तुमच्यापर्यंत पोहोचला असेल, असंही शरद पवारांनी म्हटलं.

# विचाराने आणि कृतीने ठाम असणारे अनंतराव थोपटे केंद्र स्थानी

**पुणे :** बारामती लोकसभा मतदारसंघात काही दिवसांपासून राजकारणात घडामोडींनी वेग घेतला आहे.विद्यमान खासदार सुप्रिया सुळे आणि बारामती हायटेकच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्यात सामना रंगणार आहे. मात्र, भोर विधानसभा मतदारसंघातील राज्याचे माजी मंत्री, काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत जेष्ठ नेते अनंतराव थोपटे केंद्रबिंदू होतांना दिसत आहेत. त्यांच्या विचाराने, कृतीने ठाम आणि एकनिष्ठतेमुळे गेल्या महिनाभरापासून खासदार सुप्रिया सुळे, उमेदवार सुनेत्रा पवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार, माजी मंत्री विजय शिवतारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुनील तटकरे यांनी माळवाडी येथे जाऊन त्याची भेट घेतली.





या नेत्यांच्या भेटीनंतर राजकीय वातावरण तापू लागले आहे. राज्याचे माजी मंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे वयाच्या ९३ व्या वर्षीही मतदारसंघातील असलेले वर्चस्व, त्यांची विचारांची बांधिलकी जोपासणारे मतदार ही त्यांची ताकद असल्याने त्यांचा राजकीय करिश्मा आजही कायम आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाचे दावेदार राहिलेल आणि जिल्ह्यातील काँग्रेसचे एकमेव आणि एकनिष्ठ नेते म्हणून अनंतराव थोपटे यांचे नाव आदराने घेतले जात आहे.

अनंतराव थोपटे कॉग्रेसची विचारधारा असलेले जिल्ह्यातील एकमेक ज्येष्ठ नेते असून राज्याच्या राजकारणात त्यांचे नेतृत्व जादूई करिश्मा करेल, असा विश्वास असल्यामुळे राज्यातील महाविकास आघाडीमधील नेत्यांबरोबर महायुतीच्या घटकपक्षांचे नेते, उमेदवारही त्यांची भेट घेत आहेत. पक्षाशी एकनिष्ठ राहून पुरोगामी विचारांशी कधीही तडजोड न करणारे नेते म्हणून त्यांची ओळख असल्याने त्यांचा आशिर्वाद आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेण्यासाठी त्यांच्या घरी नेत्यांची रीघ लागली आहे.

अनंतराव थोपटे हे भोर विधानसभा मतदारसंघातून १९७२, १९८०, १९८५, १९९०, १९९५ आणि २००४ असे सहावेळा आमदार म्हणून विजयी झाले आहेत. १९९९ सालातील निवडणुकीत ते मुख्यमंत्रीपदाचे दावेदार होते. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचे काशिनाथराव खुटवड यांनी त्यांचा पराभव केला होता. अनंतराव थोपटे यांची एकनिष्ठा आणि पुरोगामी विचारसरणी यामुळेच राज्याच्या राजकारणात त्यांचे नाव आदराने घेतले जाते. सद्यस्थितीत राज्यातील अनेक पक्षांचे नेते त्यांच्याकडे येऊन आपल्या फायद्यासाठी त्यांना जुन्या आठवणींना उजाळा देत जाणीव करून देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

परंतु अनंतराव थोपटे आपल्या एकनिष्ठ विचारसरणी मुळे ते स्वतःच्या फायद्यासाठी आणि स्वार्थासाठी कधीही तडजोड करणार नसल्याचे बोलले जात आहे. अनंतराव थोपटे हे ज्यांच्या डोक्यावर हात ठेवतील तोच बारामतीचा खासदार आणि भोरचा आमदार होतील अशी भावना भोरमधील मतदार व्यक्त करीत आहेत. २००९ साली अनंतराव थोपटे यांनी मुलगा संग्राम थोपटे यांना राजकारणात आणले आणि आमदारही केले. तेंव्हापासून संग्राम थोपटे हे २०१४ आणि २०१९ अशा सलग तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत.अनंतराव थोपटे यांचे चिरंजीव आमदार संग्राम थोपटे यांनी आपल्या वडिलांप्रमाणेच कृषी उत्पन्न बाजार समिती, साखर कारखाना, खरेदी विक्री संघ, भोर नगरपालिका, ग्रामपंचायत अशा विविध संस्थांवर वर्चस्व राखले आहे.

# साताऱ्यात शरद पवार यांनी काढला हुकमी एक्का

## उदयनराजे भोसले यांच्या विरोधात शशिकांत शिंदे यांना उमेदवारी

**सातारा :** गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या सातारा लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचा उमेदवार अखेर ठरला आहे. शरद पवार गटाकडून साताऱ्यातून शशिकांत शिंदे यांना उमेदवार देण्याचे निश्चित झाल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शशिकांत शिंदे हे येत्या १५ तारखेला ११ ते २ या वेळेत सातारा लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरणार आहेत. शरद पवार गटाकडून मंगळवारी मुंबईतील महाविकास आघाडीच्या संयुक्त परिषदेत साताऱ्यासाठी शशिकांत शिंदे यांच्या नावाची घोषणा होऊ शकते. त्यानंतर शशिकांत शिंदे यांचा उमेदवारी अर्ज भरताना साताऱ्यात मविआकडून जोरदार शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे. शरद पवार स्वत: शशिकांत शिंदे यांना उमेदवारी अर्ज भरण्याच्या दिवशी साताऱ्यात जाणार आहेत. त्यादृष्टीने साताऱ्यात शरद पवार गट आणि शशिकांत शिंदे यांचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत.



**साताऱ्यात उमेदवार निवडण्यासाठी शरद पवारांचा वेटिंग गेम**

सातारा लोकसभा मतदारसंघ हा गेली अनेक वर्षे भाजपचा बालेकिल्ला राहिला आहे. राष्ट्रवादीचे श्रीनिवास पाटील हे साताऱ्याचे विद्यमान खासदार आहेत. मात्र, यंदा त्यांनी प्रकृतीच्या कारणास्तव लोकसभा निवडणुकीला उभे राहण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे साताऱ्यात कोणाला उभे करायचे, हा प्रश्न शरद पवार गटासमोर होता.

शरद पवार यांच्याकडून म ध्यंतरीच्या काळात काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्यासमोर तुतारीच्या चिन्हावर साताऱ्यातून लढण्याचा प्रस्ताव मांडला होता. मात्र, पृथ्वीराज चव्हाण यांनी तुतारीच्या चिन्हावर लढण्यास नकार दिला होता. त्यामुळे शरद पवार साताऱ्यातून कोणाला रिंगणात उतरवणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. अखेर शरद पवार यांनी शशिकांत शिंदे यांच्या नावावर शिक्का मोर्तब केल्याची माहिती समोर येत आहे.

**कोण आहेत शशिकांत शिंदे?**

माथाडी कामगारांचे नेते म्हणून प्रसिद्ध असलेले शशिकांत शिंदे सातारा जिल्ह्यातील वजनदार नेते आहेत. शिंदे यांनी जावळी आणि कोरेगाव या दोन विधानसभा मतदारसंघांचं प्रतिनिधित्व केलं आहे. या दोन्ही तालुक्यात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. कार्यकर्त्यांची मोठी फळी त्यांच्यासोबत आहे. त्यामुळे शशिकांत शिंदे आगामी लोकसभा निवडणुकीत उदयनराजे भोसले यांच्यासमोर कडवे आव्हान निर्माण करतील.

## वाठार येथे झालेल्या अपघातातील जखमी युवकाचा मृत्यू

**कोरेगाव :** लोणंद – सातारा राष्ट्रीय महामार्गावर वाठार स्टेशन येथील वाग्देव हायस्कूल नजीक बुधवार दि. ३ रोजी सायंकाळी साडे नऊच्या सुमारास कार व दुचाकीच्या अपघातात जखमी झालेल्या युवकाचा आज मृत्यू झाला.मृत युवकाचे नाव मनोज शामराव जाधव वय २१ रा. वाठार स्टेशन असे आहे.

वाठार स्टेशन पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सातारा – लोणंद राष्ट्रीय महामार्गावर वाठार स्टेशन येथील वाग्देव हायस्कूल नजीक बुधवार दि. ३ रोजी मनोज शामराव जाधव हा युवक हिरो होंडा स्प्लेंडरवरून वाठार बाजू कडून लोणंदच्या दिशेने जात असताना समोरून भरधाव वेगात येणारी हुंडाई कंपनीची औरा कारने मोटर सायकलला जोराची धडक दिली. या धडकेत मोटर सायकलस्वार मनोज यास डोक्यास व हातापायास गंभीर मार लागल्याने रक्तस्त्राव होऊन बेशुद्ध पडला. या घटनेची खबर मिळताच स्थानिक लोकांनी गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या मनोज यास वाठार स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी सातारा येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्या ठिकाणी उपचार घेत असताना प्रकृतीत सुधारणा न झाल्याने अधिक उपचारासाठी पुणे येथील ससून हॉस्पिटल मध्ये दाखल केले मात्र आज रविवार दि. ७ रोजी पहाटेच्या सुमारास उपचारादरम्यान गंभीर जखमी असलेल्या मनोज शामराव जाधव याचा मृत्यू झाला.या अपघाताची फिर्याद अमर जाधव याने वाठार पोलिसात दिली असून तपास हेड कॉन्स्टेबल दिपाली पोरे करीत आहेत.



## संक्षिप्त

### पांगारीच्या शासकीय आश्रमशाळेतील श्रेयश कंकची सैनिकी शाळेसाठी निवड



**भोर :** एकीकडे शासन पटसंख्येच्या अभावी शाळा बंद करत असताना दुसरीकडे मात्र भोर तालुक्यातील दुर्गम भागातील वेळवंड खो-याच्या पांगारी माध्यमिक आश्रम शाळेच्या श्रेयस गणेश कंक या विद्यार्थ्याने आपल्या हुशारीच्या व बुद्धिमत्तेच्या जोरावर इ ६ वी च्या पात्रता सैनिकी परिक्षेत घवघवीत यश मिळवत सैनिकी शाळेसाठी पात्र ठरत स्वतः ची निवड सार्थ केली आहे.सातारा व चंद्रपूर येथे या सैनिकी शाळा आहेत. पांगारी (ता.भोर) येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा वेळवंड खोऱ्याच्या दुर्गम भागात असून या शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावणारा आहे. या शाळेत मुलांच्या प्रगतीसाठी आणि बौद्धिक विकासासाठी या शाळेतील शिक्षक नेहमी प्रयत्नशील असतात, तसेच पालकांचे सहकार्य मुलांना मोठ्या प्रमाणात लाभत आहे त्याच्या जोरावर या शाळेतील अनेक विद्यार्थी यश संपादन करून बाहेरगावी चांगल्या हुद्द्यावर आहेत. या शाळेचे मुख्याध्यापक प्रा.सोनवणे यांनी श्रेयसची उत्तम तयारी करत वर्गशिक्षक प्रा.आले यांच्या मदतीने मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांगारीचे मुख्याध्यापक निलकंठ लोंढे व उपशिक्षक अनिस शेख यांचेही अनमोल मार्गदर्शन लाभले. श्रेयसची सैनिकी शाळेसाठी निवड झाल्याने तालुक्यातुन त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. इयत्ता पाचवीतुन सहावीसाठी सैनिकी शाळेसाठी निवड झालेला श्रेयस हा तालुक्यातील बहुदा पहिलाच विद्यार्थी असल्याचे त्यांचे वडील गणेश कंक कडून सांगण्यात आले. तसेच गेल्या वर्षी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये याच शाळेतील विद्यार्थिनी कु सई गणेश कंक हिचा नवोदय विद्यालय पुणे (शिरूर) येथे यशस्वी विद्यार्थ्यीनी म्हणून नंबर लागलेला होता ही गौरवास्पद बाब असल्याचे कंक यांनी सांगितले.

### आचारसंहितेमुळे खेडशिवापूर टोलनाक्यावर दरवाढ थांबवली; काही काळासाठी प्रवाशांना दिलासा

**नसरापूर :** पुणे सातारा महामार्गावरील खेड-शिवापुर टोलनाक्यावर एक एप्रिलपासून होणारी टोलवाढ रोखण्यात आली आहे. त्यामुळं काही काळासाठी प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. आचारसंहितेमुळे केंद्रीय निवडणूक आयोगाकडून ही टोलवाढ थांबवण्यात आली आहे. तसे पत्र टोल व्यवस्थापकांना देण्यात आले आहे. सातारा महामार्गावरील खेड शिवापूर टोल नाक्यावर एप्रिलपासून टोलची दरवाढ करण्यात आली होती. एक एप्रिलपासून सुमारे अडीच टक्के टोल वाढ होणार असल्याचे टोल रोड प्रशासनामार्फत पत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. तसंच, प्रवाशांनी या टोल वाढीसाठी सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले होते. मात्र, आता लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत. राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेमुळे केंद्रीय निवडणूक आयोगाकडून टोलवाढ थांबविण्यात आली आहे. लोकसभा निवडणुका झाल्यानंतर ही नवीन टोल दरवाढ लागू करण्यात येईल, अशी माहिती पुणे सातारा टोल रोडचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले आहे. सध्या देशभरात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही वाढीव टोल दरवाढ थांबविण्यात आली आहे. त्यामुळे सध्या तरी वाहन चालकांना पुर्वीचाच टोल भरावा लागणार आहे. प्रशासनाने पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकानुसार, कार, जीप व हलक्या वाहनांसाठी टोलच्या दरात पाच रुपयांची वाढ होणार होती. तर, हलक्या व्यवसायीक वाहनांच्या टोल दरातही पाच रुपयांची वाढ होणार होती. या दरानुसार, वाहनांना १८५ ऐवजी १९० रुपये द्यावे लागणार होते. बस आणि ट्रेकसाठी दहा रुपयांची वाढ होणार होती. त्यामुळं ४०० रुपये टोल भरावा लागणार होता. जड वाहनांसाठी ४१५ रुपयांवरुन पाच रुपये वाढणार होता. तसंच, अवजड वाहनांसाठीच्या ६१५ रुपये टोल मध्ये १५ रुपयांची वाढ होणार होती. मात्र, आता सध्या टोलवाढीच्या निर्णयाला स्थगीती देण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकांनंतर टोलदरात वाढ होण्याची शक्यता आहे.

# ग्रामीण भागात बैलांना पत्री मारण्याचा व्यवसाय झाला नामशेष

## शेतकऱ्यांचा यांत्रिकीकरणाकडे वाढला कल, बैलांची संख्या घटली

**पुणे :** आपला भारत देश हा कृषिप्रधान देश असून आजही आपल्याकडे पारंपारिक पद्धतीने शेती केली जाते. ही शेती करताना बऱ्याच ठिकाणी बैलांचा वापर करतात. शेती करताना मात्र बैलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले जाते. शेतकरी आपल्या बैलांची निगा राखताना विशेष करून बैलांच्या पायाकडे म्हणजेच खुरांकडे लक्ष देतो. या खुरांची झीज होऊ नये, त्यांना इजा होऊ नये म्हणून त्या खुरांना पत्री मारण्याची पध्दत आहे.आणि हिच पत्री मारताना पत्री मारणारे म्हणजेच नाल बांधणाऱ्या कारागिरांना बोलवले जाते. आणि बैलांना विशिष्ट पद्धतीने जमिनीवर खाली अलगत पाडुन, त्यांना झोपवून त्यांचे पाय जमिनीपासून थोड्या उंचीवर बांधुन विशिष्ट पद्धतीने बैलाला इजा होणार नाही अशी पत्री मारली जाते.अलिकडील काळात शेती ही मोठ्या प्रमाणात



यंत्राच्या होत असल्याने शेतीच्या यांत्रिकीकरणाकडे लोकांचा कल वाढला आहे त्यामुळे आपोआपच बैल जोड्याही कमी होताना दिसत आहे.

पुर्वी ग्रामीण भागासह सर्वत्र बैलांची संख्या जास्तीची होती. दळवळणासाठी, औजड माल वाहतूक करण्यासाठी, शेती करण्यासाठी,

> भोर तालुक्यात वर्षानुवर्षे, पिढीजात पारंपारिक आमचा पत्री मारण्याचा व्यवसाय आहे परंतु अलीकडील काळात तालुक्यासह सर्वत्र बैलांची संख्याच कमी झाल्याने या व्यवसायावर मोठ्या प्रमाणात विपरित परिणाम झाला असून आम्हाला या व्यवसायातून मिळणारे पूर्वीसारखे उत्पन्न मिळत नाही आमचा हा व्यवसाय नामशेष झाल्याने आमच्या रोजी रोटीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.कच्च्या मालाच्या किमतीत वाढ झाल्याने व दुर्गम भागात बैलजोडी राहील्याने जाण्या येण्याचा खर्चही परवडत नाही.
> - **फिरोज नालबंद,** नालबंद कारागीर भोर

उत्पन्नाचे साधन तसेच हौस म्हणूनही बैल जोडी पाळली जात होती त्यामुळे त्यांच्या आरोग्याकडे शेतकरी अधिक लक्ष देत असे. विशेष करून बैलांच्या खुरांची पायांची देखभाल जास्तीची केली जात असे. टणक, खडकाळ, मुरमाड,मऊ, कठीण अशा जमिनीवर, रस्त्यावर बैल सुरळीत चालावा याकरिता बैलांच्या पायांना पत्री मारली जात असे. दोन महिन्यातून एकदा म्हणजेच वर्षभरात पाच ते सहा वेळा पत्री नालबंद मारत असे. त्यावेळी हा पत्री-नाल बांधण्याचा व्यवसाय खुप जोरदार चालत असे त्यातून नाल बांधणाऱ्या प्रवर्गाला् खुप उत्पन्न मिळत असे. बऱ्याच लोकांचे प्रपंच या व्यवसायामुळे चालत होते. परंतु अलीकडील काळात शेतीचे यांत्रिकीकरण झाल्याने बैलांची संख्या घटली असून हा पत्री मारण्याचा व्यवसाय काळाच्या आड जात चालला असून नामशेष होत चालला असल्याचे भोर नगरीचे माजी नगरसेवक निसारभाई नालबंद यांनी सांगितले.

### व्यवसाय वाढीसाठी व्यावसायिकांकडून महामार्गाचा दुभाजक पंक्चर

**पुणे :** पुणे सातारा जाणाऱ्या शिंदेवाडी घाट, खेड शिवापूर, चेलाडी, वेळू, सारोळा या ठिकाणी रस्त्यांवर अनेक ठिकाणी दुभाजक बेकायदा पंक्चर करून रस्ते केले गेले आहेत. हे दुभाजक पंक्चर करण्याचे काम खुलेआम सुरू असून हॉटेल व्यावसायिक, नवीन तयार करण्यात आलेले फुड मॉल व पेट्रोल पंप व्यावसायिकांच्या ठिकाणी अशी तोडा तोड प्रामुख्याने आहे. महामार्गावरील रस्ता दुभाजक आपल्या व्यवसायाच्या वाढीसाठी तोडण्याचे उद्योग सुरू आहेत. दुभाजक असे बेकायदा तोडले गेलेल्या ठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढले आहे. रस्ते सुरक्षा समितीत दुभाजक तोडणाऱ्या (पंक्चर करणाऱ्या) विरुद्ध कारवाईचा निर्णय आहे. परंतु राष्ट्रीय महामार्ग वर अशा कारवाईची प्रतीक्षा आहे.

या महामार्गांवर सार्वजनिक महामार्ग प्राधिकरणाच्या विभागाद्वारे तसेच रस्त्यांचे काम केलेल्या खासगी ठेकेदार कंपनीद्वारे रस्ता दुभाजक टाकले गेले आहेत. बहुतांश ठिकाणी असे दुभाजक सिमेंट कॉंक्रिटचे आहेत. पण अखंड स्वरूपात असलेले बहुतांश असे दुभाजक आपल्या व्यवसायासाठी फायदा व्हावा म्हणून पंक्चर करण्याचे व तेथून रस्ता करण्याचे प्रकार अनेक ठिकाणी झाले आहेत.

# वेळवंड खोऱ्यात दुपाच्या उन्हाच्या तडाख्यामुळे रात्रीच्या वेळी शेतीची कामे

**भोर :** तालुक्याच्या वेळवंड खोऱ्यासह सर्वत्रच रब्बी पीकांचा हंगाम अंतिम टप्प्यात आला आहे. या भागातील शेतकरी या हंगामातील पिके गहू, ज्वारी, हरभरा काढणीसाठी लगबगीला आला आहे. दुपारी तीव्र उन्हाचा चटका बसत असल्याने शेतकऱ्यांनी पहाटे व सायंकाळी रात्रीच्या वेळी कामाला पसंती दिली आहे.

मागील पंधरा दिवसांपासून गहू ज्वारी हरभरा ही पिके काढणी सुरू आहेत. हि पिके काढल्यावर त्यांना पुरेसे उन्हं दिल्यावर त्यांची मशिनद्वारे भरडणी केली जात आहे. यावर्षी वाढलेली थंडी ,मुबलक पाणी, व पोषक वातावरण यामुळे गव्हाचे पीक जोमात येऊनही गव्हाला अपेक्षेप्रमाणे उतारा मिळाला नसल्याचे शेतकरी सांगत आहे. ज्वारीला मात्र उतारा चांगला



असल्याने यावर्षी ज्वारीच्या उत्पादनात वाढ झाली आहे. ज्वारीचा कडबाही चांगल्या प्रतीचा असल्याने त्यालाही अपेक्षेप्रमाणे भाव मिळत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

वेळवंड खोऱ्यात ही अंतिम टप्प्यात असताना या भागातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या विद्युत पंपाच्या केबल चोरीला गेल्या, मोटर चोरीला गेल्या परंतु तरीही शेतकऱ्यांनी पुन्हा नव्याने केबल जोडून हि पीके जोमाने घेत कितीही संकटे शेतकऱ्यांवर आली तरी तो कधी मागे हटत नसतो हे दाखवून दिले.

वेळवंड खोऱ्यात अजुनही या हंगामातील गव्हाचे पीक हार्वेस्टर मशीनचा वापर न करता हा पारंपरिक पद्धतीने काढले जात आहे. तसेच ज्वारी उपसण्यासाठी हलक्या छोट्या आकाराच्या वाकासाचा, कुदळीचा वापर केला जात आहे. दुपारी कडक उन्हाचा तडाखा असल्याने पहाटे व रात्रीच्या वेळी शांत वातावरणात गहू, ज्वारी, हरभरा भरडणी केली जात असल्याचे भोलावडेतील प्रगतशील शेतकरी व भरडणी मशीन मालक गणेश रानबा आवाळे यांनी सांगितले.यावर्षी धरणात यावेळी टक्के पाणीसाठा शिल्लक राहिल्याने पुढे पाणी टंचाई निर्माण होणार असे शेतकरी वर्गात बोलले जात आहे.

# पुणे-सातारा महामार्गावर लुटमार करणाऱ्या तिघांना अटक

**नसरापूर :** पुणे-सातारा महामार्गावर रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांना थांबवून मारहाण करत लूटमार करणाऱ्या तिघांना राजगड पोलिसांनी अटक केली आहे. मोहम्मद अनिस शेख (वय २७, रा. मलकापूर, ता. कराड, जि. सातारा) यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार (ता. ५) रात्री एक वाजण्याच्या सुमारास शेख हे त्यांची दुचाकीवरून (क्र. एम.एच बी.जी.) सातारा बाजूकडे जात होते. महामार्गावर कामथडी (ता. भोर) येथे मागून स्प्लेंडर दुचाकीवरून आलेल्या तिघांनी त्यांना थांबवले. तुमची पाठीमागे बांधलेली बॅग पडायला आली आहे, असे सांगून त्यांनी शेख यांना थांबवले. थांबल्यावर त्यांना मारहाण करत त्यांच्याकडील हजार रुपये किमतीचा मोबाईल आणि रोख




बाराशे रुपये घेऊन गेले. घटनेची माहिती मिळताच राजगड पोलिस ठाण्यातील रात्रगस्ती पोलिसांनी तातडीने पाठलाग करत सुनील रघुनाथ मादस्वार (वय २१, रा. कोथरूड, पुणे), ऋषिकेश चंद्रकांत चंदनवाले (वय २०, रा. फुरसुंगी, पुणे) आणि लकी देविदास बर्गे (वय २३, रा. सातववाडी, हडपसर) यांना अटक केली. तीन्ही आरोपींना शनिवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. राजगड पोलिस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# शहरासह ग्रामीण भागात निवडणुकीच्या धामधुमीत पोलिसांची गस्त कायम

**भोर :** सध्या लोकसभा निवडणुकीची सर्वत्रच धामधूम सुरू असून लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भोर पोलिसांनी पोलीस निरीक्षक आण्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवला असुन ग्रामीण भागात आपली असणारी रात्रीची गस्त कायम ठेवली आहे.

लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर भोर पोलिसांनी बंदोबस्ताची आखणी केली आहे.बारामती लोकसभा मतदारसंघ हा मोठा मतदार संघ असुन भोर वेल्हा, दौंड, इंदापूर, पुरंदर, खडकवासला आणि बारामती हे तालुके या मतदारसंघात



समाविष्ट आहेत.त्यामुळे भोर शहरासह ग्रामीण भागात प्रथम कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याला पोलीसांनी प्राधान्य

> भोर पोलीस स्टेशन हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कोणाचीही गय केली जाणार नाही. गुन्हेगारांना कायद्याने कडक शासन केले जाईल. लवकरच चोरींच्या घटनेचा तपास करून त्या चोरांना जेरबंद केले जाईल.
> - **आण्णा पवार,** पोलीस निरीक्षक (भोर पो. स्टे)

दिले आहे.

ग्रामीण भागात नदी किनारी तसेच भाटघर धरण परिसरात शेतीपंप व मोटरकेबल चोरांचा सुळसुळाट वाढला आहे. भुरट्या चोरीच्या घटना ही वाढल्या आहेत. याच चोरांच्या मुसक्या आवळण्यासाठी

> तालुक्याच्या नजीक असणारा बसरापुरचा नदी किनारा धरण बॅक वॉटर पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे परंतु सुट्टीच्या दिवशी या ठिकाणी मद्यपी पर्यटकांकडून व प्रेमी युगुलाकडुंन वातावरण बिघडले जात आहे.याचाच फायदा चोरट्यांनी घेतला असून नदीपात्रात चोरीच्या घटना वाढल्या आहेत.भोर पोलीस स्टेशनला कळविले असता तात्काळ दखल घेत सुट्टीच्या दिवशी गस्तीचा फेरा वाढविला आहे.
> - **केशव साळुंके,** पोलीस मित्र (बसरापुर, ता. भोर)

भोरचे पोलिस निरीक्षक आण्णा पवार यांनी कंबर कसली असून आपल्या सहकाऱ्यांसमवेत स्व:ता रात्रीची गस्त उशिरा पर्यंत घालत निवडणूकी कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी काळजी घेत आहे.

# आंबेगाव बुद्रुक, शिंदेवाडी अनधिकृत वेश्या व्यवसाय जोमात

**खेड-शिवापुर :** आंबेगाव बुद्रुक परीसरात सुरु असलेल्या अनधिकृत वेश्या व्यवसायाचे पेव आता शिंदेवाडी (ता. भोर) परीसरातही येऊन पोचले आहे. येथील जुना जकात नाका परीसरात पुणे सातारा रस्त्यावर अनधिकृत वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला उभ्या राहत असून परीसरातील काही लॉजिंगमध्ये त्यांच्याकडून अनधिकृत वेश्या व्यवसाय केला जात आहे.

गेल्या काही वर्षापासून नवले पूल कात्रज बाह्यवळण महामार्गावर असलेल्या लॉजिंगमध्ये या ठिकाणी रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या काही महिलांकडून अनधिकृतपणे वेश्या व्यवसाय सुरु आहे. या परीसरात सुरु असलेल्या अनधिकृत वेश्या व्यवसायाचे पेव आता कात्रज नवीन बोगद्याच्या अलीकडे पुणे सातारा रस्त्यावरील शिंदेवाडी (ता. भोर) परीसरात पोचले आहे. गेल्या काही दिवसांपासून येथील कात्रज नवीन बोगदा आणि जकात नाका परिसरातील रस्त्यावर अनधिकृत वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला उभ्या राहतात. येथून ये-जा करणाऱ्या वाहन चालकांना हातवारे आणि इशारे करून खुणावतात. त्या या परीसरात असलेल्या काही लॉजिंगमध्ये अनधिकृतपणे वेश्या व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

या परीसरात अनेक लहान मोठ्या कंपन्या आहेत. या कंपन्यामध्ये काम करणारा महिला वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. तसेच या भागात अनेक लोकवस्ती आहेत. त्यामुळे महिला आणि शाळकरी मुलांची येथून ये-जा सुरु असते. मात्र गेल्या काही दिवसांपासून या परीसरात अनधिकृत वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला उभ्या राहत आहेत.

त्यामुळे स्थानिक नागरीकामध्ये असुरक्षिततेचे वातावरण आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागात अनधिकृत वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला उभ्या राहत आहेत. परीसरात असलेल्या काही लॉजिंग व्यवसायिकांकडून त्याला खतपाणी घातले जात असल्याचे येथील अनेक स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या भागात सुरु झालेल्या या अनधिकृत प्रकारावर पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरीक करत आहेत.

# सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी आता महायुतीचे दिग्गज नेते मैदानात

**पुरंदर :** महायुतीच्या अधिकृत उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी आता महायुतीचे दिग्गज नेते मैदानात उतरले आहेत. काल देवेंद्र फडणवीस यांनी पुरंदरमध्ये सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी कार्यकर्ता मेळावा घेतला.

तर दुसऱ्या बाजूला आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील ११ एप्रिल रोजी सासवडमध्ये जाहीर सभा होत आहेत.अजित पवारांच्या सभा बारामतीत होत आहेतच. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्यासाठी आता महायुती कामाला लागल्याचे दिसून येत आहे.

सुरूवातीला शिवसेना शिंदे गटाचे माजी मंत्री विजय शिवतारे यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. मात्र मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर त्यांनी मवाळ भूमिका घेत सुनेत्रा पवारांना बहुमताने विजयी करण्याचं काम करणार असल्याचे जाहीर केले. यातच आता विजय शिवतारे यांच्या विनंतीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची सासवड येथे सभा पार पडणार आहे. या सभेतून महायुतीचे नेते काय बोलणार ते पाहणं महत्वाचं ठरणार आहे.तर सासवडच्या सभेनंतर विजय शिवतारे सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी सक्रिय होणार आहेत.

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी बारामती लोकसभा मतदारसंघात लोकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे. ठिकठिकाणी लोक जोरदार स्वागत करीत आहेत. बारामतीत फारशी काम नाहीत परंतु बारामती मतदारसंघातील इतर तालुक्यांमध्ये खुप काम राहिली आहेत. ती सर्व कामे करायची आहेत. यामध्ये शेतकऱ्यांची मोठी कामे असून लोकांनी संधी दिली तर आगामी काळात ती कामे निश्चितपणे पुर्ण केली जातील. अशी प्रतिक्रिया सुनेत्रा पवार यांनी दिलीय.


दरम्यान, सुनेत्रा पवार यांच्यासमोर तीन टर्म खासदार राहिलेल्या सुप्रिया सुळे यांचं मोठं आवाहन असणार आहे. त्यामुळेच अजितदादांनी सगळी यंत्रणा आता सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी लावून दिली आहेत. यातच काल देवेंद्र फडणवीस पुरंदरमध्ये दाखल झाले होते. यावेळी सुप्रिया सुळे यांच्या प्रचार प्रमुखांनी देखील फडणवीसांची भेट घेतल्याने एकच चर्चा सुरू झालीय. त्यामुळे सुनेत्रा पवारांना विजयी करण्यासाठी आता महायुती जोमाने कामाला लागल्याचे दिसू लागले आहे.

# भोर तालुक्यातील आळंदे येथे विवाहितेची विहिरीत उडी मारून आत्महत्या

## राजगड पोलीस ठाण्यात ४ जणांविरोधात गुन्हा दाखल

**कापूरहोळ :** आळंदे (ता. भोर) येथे एका विवाहित महिलेने विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. गौरी दिपक राजेशिर्के (वय ३१ वर्ष, रा. आळंदे, ता. भोर) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत राजगड पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल पती दिपक रामचंद्र राजेशिर्के (रा. आळंदे ता. भोर), सासू प्रतिकला रामचंद्र राजेशिर्के (रा. आळंदे ता. भोर), नणंद कल्याणी राजेंद्र राजेमहाडिक (रा. तारळे ता. पाटण) आणि उर्मिला उर्फ रसिका योगेश सुर्वे(रा. केडगाव, अहमदनगर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मयत गौरी यांच्या आई जयश्री मारुती कदम (वय ५५ वर्षे, रा. गोखलेनगर, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मयत गौरी आणि दिपक राजेशिर्केयांचा १४ जून २०२३ रोजी प्रेमविवाह झाला. यानंतर थोडे महिने व्यवस्थित संसार चालला. त्यानंतर पती दिपक व सासू प्रतिकला हे मयत गौरीचे वारंवार मानसिक व शारीरिक छळ करू लागले. तसेच सन २०२३ दिवाळी मध्ये तुझा पार्लरचा कोर्स झाला आहे, तर तु तुझ्या घरच्यांकडुन गावामध्ये पार्लरचे दुकान टाकण्यासाठी १ लाख रूपये घेवुन ये असे म्हणत पती दिपक, सासू प्रतिकला तसेच नणंद कल्याणी व उर्मिला हे चौघे जण मयत गौरी ला वारंवार शारीरिक व मानसिक त्रास देऊ लागले.



त्यानंतर शुक्रवारी सकाळी ११ वा. मयत गौरीने पती दिपक यास सकाळी कामावर जात असताना गार पाण्याची वाटली भरून दिली नाही, या शुल्लक कारणावरून लाथाबुक्यांनी खूप मारहाण केल्याने गौरीने आई जयश्री कदम यांस फोन लावून सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर दिपक याने गौरीची बहीण अश्विनीच्या मोबाईलवर फोन करून आताचे आता तुझे बहीणीला येवून घेऊन जा नाहीतर मिनीटामध्ये तिला पुण्यामध्ये घेवुन येवुन फेकुन देतो अशी धमकी देवून शिवीगाळ केली आणि फोन कट केला. त्यानंतर जयश्री कदम यांनी मुलीची विचारपूस करण्यासाठी दुपारी फोन केला असता गौरीच्या सासरच्या लोकांनी गौरी ही विहीरीत पाय घसरून पडून मयत झाली असल्याचे सांगितले. त्यानंतर गौरीच्या सासरचे नातेवाईक रात्री आळंदे येथे पोहोचले असता. गौरी ही भांडी घासण्यासाठी घराच्या शेजारी असलेल्या विहीरीवर गेली असता पाय घसरून विहिरीत पडून मृत पावल्याचे गौरीचे पती दिपकने गौरीच्या माहेरच्या नातेवाईकांना सांगितले. परंतु मयत गौरीच्या आई जयश्री कदम यांनी गौरीस वारंवार मारहाण करणे, तसेच मानसिक व शारिरीक छळ करणे व तिला वारंवार पैशाची मागणी करून तिचे जीवन जगण्यास असमर्थ बनवून विहिरीत उडी घेऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी पती दिपक राजेशिर्के, सासू प्रतिकला राजेशिर्के, नणंद कल्याणी राजेमहाडिक आणि उर्मिला सुर्वे यांच्या विरोधात राजगड पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या किकवी पोलीस चौकी येथे फिर्याद दाखल केली आहे. सदर घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## संक्षिप्त



### नसरापूर वनहद्दीत वन्यजीवांसाठी पाणवठे

**नसरापूर :** वनविभागाच्या नसरापूर वनहद्दीत डोंगर भागातील वन्यजीवांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाणवठे तयार करुन त्या मध्ये पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे वन्यजीव पाण्यासाठी मानवी वस्तीकडे न येता सुरक्षित राहणार असल्याची माहीती वनपाल नितीन खताळ व वनरक्षक बाबु तांबे यांनी दिली आहे. नसरापूर परिसरातील वनहद्दीत मोर, लांडोर, भेकर, तरस, साळींदर, उदमांजर, रानमांजर, घोरपड, ससा, विविध जातीचे साप, विविध पक्षी हे वन्यजीव अढळतात तसेच काही ठिकाणी बिबट्यांचा वावर देखिल आहे परिसरातील सर्वच डोंगरभागात उन्हाळ्यात पाणीसाठे संपुष्टात येत असल्याने या वन्य जीवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते यामध्ये हे प्राणी शेतीतील विहीरी मध्ये देखिल पडतात व प्राणास मुकतात तर काही वेळा त्यांना मानवीवस्तीकडे यावे लागुन तिथे मानवा बरोबर संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते ही परिस्थिती लक्षात घेऊन दरवर्षी वनविभागाच्या वतीने डोंगरभागात नैसर्गिक पाणवठ्यात तसेच कृत्रीम पाणवठे तयार करुन त्यात पाणी सोडले जाते यामुळे या वन्यजीवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत नाही. यावर्षी देखिल नसरापूर वनपरिक्षत्र अधिकारी संग्राम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या वतीने वनहद्दीतील नसरापूर, नायगाव, वेळु, कासुर्डी, कांबरे आदी ठिकाणी पाणवठे तयार करुन त्यामध्ये पाणी सोडण्यात आले आहे.

### सासवड मध्ये गुरुवारी मुख्यमंत्री यांची सभा

**पुरंदर :** गेल्या २७ तारखेला मी महायुतीमध्ये समाविष्ट होण्याचा निर्णय घेतल्यानंतर पुरंदर तालुक्यातील गुंजवणी व विमानतळाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा केला आहे. जुन्या लेआउट प्रमाणे गुंजवणीचे काम पाच ते सहा महिन्यांमध्ये मार्गे लागणार आहे. त्याचबरोबर दिवे येथे आयटी हब निर्माण करणे गरजेचे आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री दि. ११ एप्रिल रोजी सासवड येथील पालखीतळावर सभा घेणार असल्याचे माजी मंत्री विजय शिवतारे यांनी सांगितले. सासवड (ता. पुरंदर) येथे पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी ही माहिती दिली. शिवतारे म्हणाले, दिवे येथील ७५० एकर व चांबळी येथील ४०० एकरांवर आयटी हब निर्माण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर भोर येथील एमआयडीसीचा प्रश्न देखील लवकरच मार्गी लागणार आहे. बारामती लोकसभा मतदारसंघाची लढाई ही महायुती विरुद्ध महा विकास आघाडी अशी आहे. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक्चे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, माजी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य रमेश इंगळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष उत्तम धुमाळ, बारामती पुरंदर लोकसभा मतदारसंघाचे अध्यक्ष वामन जगताप, दिलीप यादव, अमित झेंडे, शरद जगताप, उपस्थित होते. सोमवार (दि.८) रोजी सायंकाळी ४ वाजता विजय शिवतारे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या प्रमुख पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक होणार आहे.

# दुर्गम डोंगरी भागातील मतदान केंद्रे 'रेंज'मध्ये आणणार

**भोर :** बारामती लोकसभा मतदारसंघातील सर्वांत मोठ्या असलेल्या भोर विधानसभा मतदारसंघात 'शेंडो' म तदानकेंद्रांसाठी प्रभावी यंत्रणा राववण्यात येणार आहे.त्यानुसार,म हसूल विभागाच्या निवडणूक शाखेने 'ॲक्शन प्लॅन' तयार केला आहे.भोर मतदारसंघात भोर, राजगड (वेल्हे), मुळशी या तालुक्यांचा समावेश होतो. तिन्ही तालुक्यांत मोठ्या प्रम ाणांवर दुर्गम, डोंगराळ प्रदेश आणि धरणक्षेत्र आहे.कित्येक गावे,वाड्या आणि वस्त्यांमध्ये मोबाइलला नेटवर्क नसल्यामुळे संपर्क साधणे कठीण झाले आहे. अनेक ठिकाणी 'भारत संचार निगम लिमिटेड' सह (वीएसएनएल) खासगी कंपन्यांचे टॉवर आहेत. तरीही संपर्क साधणे अशक्यप्राय होऊन बसले आहे. या पार्श्वभूमीवर भोर मतदारसंघातील भोर, वेल्हे, मुळशी तालुक्यांतील मोबाइलचे नेटवर्क नसलेल्या तीस गावांतील मतदारकेंद्रांशी (रॉडो)



संपर्क साधण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. मोबाईल नेटवर्कमध्ये नसणारी गावे – भोर तालुका–जयतपाड, पांगारी, सांगवी, वेळवंड खोरे, भूतोंडे, तळजाईनगर, वेळवंड, नांदघूर, मळेची महादेववाडी, वेल्हे (राजगड) तालुका – माणगांव, पोळे, शिरकोली, कोशिंबी, कसेडी, टेकपोळे, दापसरे, गोंडेखल, घोळ, काखानू, घीसर, मुळशी– शिरवली, चांदिवली, पोमगाव, भूगाव, आंदळे धामणआड, कातरखडक, पळसे, आडमाळ, गडले. रायरेश्वर आणी बुरुडमाळ हि दोन केंद्रे दुर्गम ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतलेल्या रायरेश्वर पठारावर लोखंडी शिडीच्या मदतीने कर्मचारी मतदानाचे साहित्य मतदान केंद्रावर घेऊन जातात. येथे यंदा मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.तर वरची धानवली येथे आणि धारांबेवाडी येथे मतदार मतदार आहेत.

तालुक्यात बुरूडमाळमध्ये सर्वात कमी मतदार भाटघर धरणाच्या वरच्या भागात सांगवी वेखोजवळ बुरूडमाळ येथे ते कुटुंबे राहत असून तेथे मतदार आहेत. महिला आणी पुरुष असुन त्यांना जवळपासचे सोयीचे मतदानकेंद्र नसल्यामुळे निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार तेथेही मतदानकेंद्राची सोय करण्यात येणार आहे. दरम्यान मळेची महादेववाडी येथे रनरची व्यवस्था केली आहे उर्वरित ठिकाणी पोलिस कर्मचाऱ्यांसह वॉकीटॉकी यंत्रणा,स्थानिक पोलिस पाटील, रेशन दुकानदार आणि युवकांचे पथक कार्यरत असणार आहे. संबंधित गावांच्या आसपास अथवा परिसरात ज्या कंपनीच्या मोबाइलला रेंज असेल तेथे सर्व सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. वॉकीटॉकी आणि अन्य कामांचे नियोजन, नियंत्रण भोर महसूल विभाग कार्यालयातून केले जाणार आहे.

> भोर विधानसभा मतदार संघात गावे असुन जिल्ह्यात सर्वाधिक मतदान केंद्र आहेत भोर तालुक्यात, वेल्हेत मुळशी तालुक्यात मतदान केंद्र आहेत केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार भोर विधानसभा मतदारसंघातील संपर्क होऊ न शकणाऱ्या तीस मतदान केंद्रांसाठी प्रभावी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.त्यामुळे तेथील कामकाजाची माहिती वेळेत मिळून मतदानप्रक्रिया सुरळित होण्यास मदत होणार आहे.
>
> - **राजेंद्र कचरे,** (भोर विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी)

### जीवे मारण्याची धमकी देऊन अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**लोणीकंद :** अल्पवयीन मुलगी घरात एकटी असल्याचा गैरफायदा घेऊन जबरदस्तीने घरात घुसून शारीरिक संबंध ठेवले. तसेच याबाबत कोणाला काही सांगितले तर पंख्याला लटकवण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे.

हा प्रकार वाघोली परिसरात पीडित मुलीच्या घरात मार्च २०२४ पासून वारंवार घडला आहे. याबाबत पीडित १७ वर्षाच्या मुलीच्या आईने रविवारी (दि.७) लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन संतोष महादेव चौधरी (वय ४० रा. विश्रांतवाडी) याच्यावर पोक्सो ॲक्ट नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची १७ वर्षीय मुलगी घरात एकटी असताना आरोपी जबरदस्तीने घरात आला. मुलगी अल्पवयीन असल्याचे माहित असताना देखील तिच्या सोबत जबरदस्तीने वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले. याबाबत कोणाला सांगितले तर तुला पंख्याला लटकवेल अशी धमकी दिली. आरोपीच्या त्रासाला कंटाळून मुलीने आईला तिच्या सोबत घडलेला प्रकार सांगितला.

# तुतारीचे काय त्या आमच्याही वाड्यात वाजतात : खासदार उदयनराजे भोसले

**सातारा :** तुतारी हे चांगले चिन्ह आहे. त्या पक्षाचे नेते पण मोठे आहेत. प्रत्येक नेतृत्वाला पक्ष वाढवायचा अधिकार आहे. त्यामुळे उगाचं काही अर्थ लावू नका, तुतारीचे काय त्या आमच्याही वाड्यात वाजतात, अशी राजकीय टोलेबाजी खासदार उदयनराजे भोसले यांनी केली.

भारतीय जनता पार्टी स्थापना दिनानिमित्त उदयनराजे यांनी सातारा जिल्हा कार्यालयात भेट दिली. त्यावेळी कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलते झाले. आपण राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्या संपर्कात आहात काय असे विचारले असता त्यांनी तुतारी या शब्दावर कोटी केली.



उदयनराजे म्हणाले, मी राजकारणापेक्षा समाजकारणावर विश्वास ठेवतो आणि आजपर्यंत वाटचाल तत्वाने केली आहे. सर्व राजकीय पक्ष छत्रपती शिवरायांचे नाव घेतात पण मी तत्वनिष्ठ आहे. छत्रपतींची ध्येयधोरणे भाजप पक्ष अंमलात आणत आहे. तुतारी ही मंगल प्रसंगी वाजवितात. ज्या पक्षाचे ते चिन्ह आहे ते ज्येष्ठ आहेत. त्यामुळे मी अधिक बोलणार नाही. पण तुतारी वाद्याचं म्हणाल तर ती आमच्या वाड्यावरसुध्दा वाजते.

भाजपकडून उमेदवारीचं निश्चितीचं काय झाले या प्रश्नांवर तुम्ही फिरून फिरुन हाच प्रश्न का विचारता, असा उलट प्रश्न त्यांनी विचारला. कुरिअरला तिकिट लावून ते पार्सल करतात तसा मी सोपा नाही. काही गोष्टीची वेळ आणि पद्धत ठरलेली असते, असे ते म्हणाले.

तत्पूर्वी भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात उदयनराजे यांनी पदाधिकारी, महिला प्रतिनिधी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यानंतर पक्ष ध्वजाचे ध्वजारोहन कार्यक्रम पार पडला. तसेच नमो ॲपच्या माध्यमातून पक्षास देणगी पाठवली व उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पक्षाचे जेष्ठ कार्यकर्ते किशोर गोडबोले व रवींद्र आपटे यांना सन्मानित केले. यावेळी संतोष कणसे, मनीषा पांडे, पंकज चव्हाण, धनंजय पाटील, मनीष महाडवाले, राहुल शिवनामे, डॉ. सचिन साळुंखे, शहराध्यक्ष विकास गोसावी, रवींद्र लाहोटी, अमित भिसे, वैष्णवी कदम, रीना भणगे, अश्विनी हुबळीकर, कल्पना जाधव, उज्वला खंदारे, रोहिणी क्षीरसागर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# वाई खंडाळा तालुक्यासाठी चाळीस कोटींचा दुष्काळ निधी

**सातारा :** जिल्ह्यात खरीप हंगाम ात अल्प पावसामुळे पिके वाया गेली होती. याचा सर्वाधिक फटका वाई व खंडाळा तालुक्यांना बसला होता. त्यानुसार शासनाने या दोन तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला होता.

आता या दोन तालुक्यांतील शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीच्या भरपाईपोटी ४० कोटींचे अनुदान देण्यात येणार आहे. या दोन तालुक्यांतील एक लाख २० हजार ३९२ शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश आहे, तर जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यांना दुष्काळाच्या सवलती मि ळणार आहेत.

जिल्ह्यात खरीप हंगामात अल्प पावसामुळे अनेक तालुक्यांतील गावांत खरीप पिके वाया गेली. परिणामी, कमी पर्जन्यमान झालेल्या तालुक्यात मोठे नुकसान झाले, तर काही तालुक्यांत पिकांची उगवण झाली; पण पावसाअभावी करपून गेली होती. त्यावेळी राज्यातील १५ जिल्ह्यांतील ४० तालुक्यांत गंभीर परिस्थिती झाली होती. त्यामुळे या तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने अनुदान देण्याचे जाहीर केले होते.

त्यानुसार जिल्ह्यातील वाई व खंडाळा तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर उर्वरित तालुक्यांनी आवाज उठविल्याने उर्वरित तालुक्यात दुष्काळी उपाययोजना व सवलती देण्याचा निर्णय शासनाने घेतला. आता जिल्ह्यातील वाई व खंडाळा तालुक्यांना दुष्काळ निधीपोटी कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे.




## संक्षिप्त

### वरवे येथुन विवाहीता बेपत्ता



**नसरापूर :** वरवे खुर्द ता.भोर येथुन ता.४ एप्रिल रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास विवाहीता घरातील कोणास काहीही न सांगता घरातुन निघुन गेल्याची खबर महिलेच्या पतीने राजगड पोलिस ठाण्यात दिली असुन पोलिस संबधीत महिलेचा शोध घेत आहेत. काजल अमित भोरडे (वय २५, रा. वरवे खुर्द ता.भोर) असे बेपत्ता झालेल्या महिलेचे नाव असून तिचे पती अमित यांनी या बाबत राजगड पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची खबर दिली आहे.विवाहीता काजल ही रंगाने सावळी, चेहरा उभट, नाक साधारण सरळ, उंची पाच फुट एक इंच, अंगावर निळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस, पांढरी लेगीज व निळी ओढणी असुन डाव्या हातावर मोरपीस गोंदवलेले आहे,डाव्या हातात चांदीची अंगठी, नाकात सोन्याची चमकी, पायात चप्पल आहे शिक्षण १२ वी झाले असून मराठी बोलते असे बेपत्ता महिलेचे वर्णन देण्यात आले असुन. सदर वर्णनातील तरुम महिला कोणास अढळल्यास राजगड पोलिस ठाणे ०२११३-२७२२३३ या क्रमांकावर किंवा तपास अधिकारी सहाय्यक फौजदार सतिश चव्हाण ९९२३६९३७२८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे अवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बारेखुर्द येथील तरुणाने केली कलींगडाची शेती

राजगड न्युज नेटवर्क





भोर : सेंद्रिय व जिवाणू खताचा जास्तीत जास्त वापर करून नैसर्गिक शेती केली जाते.असाच नैसर्गिक शेतीचा वापर करून भोर तालुक्यातील बारे खुर्द येथील सौरभ दत्तात्रेय खुटवड या तरुण शेतकऱ्याने पारंपरिक भात शेतीला फाटा देत उन्हाळी कलिंगडाची शेती यशस्वी केली आहे

भाटघर पाणलोट क्षेत्रात भाताची शेती म्हणून ख्याती असलेल्या या परिसरात हमखास नगदी पीक असलेली कलिंगडाच्या शेतीचा अभिनव प्रयोग कृषी पदविकेचे शिक्षण घेत असताना यशस्वी करून दाखविला, सुरवातीला नांगरट करून रोटावेटर मारून ४ फुटाची सरी पाडली नंतर ड्रीप जोडून मलचिंग पेपर अंथरूण ४ फुट बाय १ फुट अंतरावर मेलॉडी या वाणाच्या रोपांची लागण केली .त्याला दर दोन दिवसाला पाणी दिले. लागण केल्यानंतर ६० व्या दिवशी कलिंगड तोडणीस सुरूवात केली. रासायनिक शेती न करता सेंद्रिय शेती करतो. या मध्ये मला सायबेज आशा या संस्थेचे मोलाचे सहकार्य भेटते. पहिल्या तोड्याला १२ टन आता प्रतिकीलो १४ ते १६ रू भाव भेटत आहे. पहिल्या तोड्याल १२ टन दुसऱ्या तोडायला ४ ते ५ टन फळे निघतील. सेंद्रिय पद्धतीने पिकवल्या मुळे चवीला अधिक गोड व अधिक काळ टिकत असल्याने फळाला जास्त मागणी आहे.

शेतावर येऊन ग्राहक खरेदी करतात खत व्यवस्थापन - २५ टक्के कुजलेल्या शेणापासून गांडूळ खत स्वतः घरी तयार करून. एकरी १ टनाचा वापर केला. जीवामृत स्लरी १० किलो गाईचे शेण १० लिटर गोमूत्र २ किलो बेसन पिठ २ किलो काळा गुळ आणि १ मूठ जीवनी असलेली वडाच्या झाडाखालची माती.१८० लिटर पाणी याचे एकत्र मिश्रण करून ८ दिवस हे मिश्रण रापत ठेऊन त्याचा वापर एकरी २०० लिटर प्रमाणे दर ४दिवसाला त्याचा ठीबकच्या माध्यामतून दिले. लागवडीनंतर पंधरा दिवसांनी जिवामृत, गायीच्या शेणापासून तयार झालेले जिवाणू संवर्धन आदी सेंद्रिय खतांचा वापर करण्यात आला. उत्पादन खर्च - कलिंगडाच्या रोपांसाठी ९ हजार,सैंद्रिय खतांसाठी ४ हजार ,ठिबक सिंचनासाठी व मलचींग पेपर १५ हजार मशागत ३ हजार, घरी बनवलेले निमअर्क व दशपर्णी अर्क याचा वापर केल्या मुळे फवारणीचा खर्च वाचला आहे. मजुरीसाठी २ हजार खर्च करण्यात आला आहे. दशपर्णी अर्काने कीड नियंत्रण - दशपर्णी अर्काची ४ दिवसांनी ( ५० लीटर गोमुत्र, कडु लिंब,रुई,समदीर सोक, गिरिपुष्प, करंज निर्गुडी, टनटनी, सिताफळ, लाल कन्हेर, पपई, एरंडाची पाने किलो गुळवेल प्रती २ किलो, तंबाखू पावशेर, हळद पावशेर, आलं, हिरवी मिरची, लसुण यांचे वाटण करून टाकले दोन महिने मुरत ठेवून नंतर हे मिश्रण गाळून घेतले) फवारणी केल्याने कीड नियंत्रणात आली.घरीच लिंबाचा पाला व शेण गोमूत्र यापासून निम अर्क आणि दशपर्णी अर्क हे घरीच तयार करून त्याचा ४ दिवसाला फवारणी केली त्याच प्रमाणे मध्ये मध्ये झेंडूची रोपे लाऊन कीड नियंत्रण केले. कुटुंबाची साथ- सौरभला वडील दत्तात्रय नारायण खुटवड, आई द्रोपदा व मोठा भाऊ अजय आदींची सेंद्रिय शेती कसण्यास मोलाची मदत होते. गावातच हातविक्रीने कलिंगडाची विक्री करतात. लोकांनाही रास्त भावात कलिंगड मिळण्यास मदत झाली आहे. सेंद्रिय शेती करत असताना खूप शेतकऱ्यांनी भेट दिली अगदी महाराष्ट्र बाहेरील लोकांनी येऊन भेट दिली. सेंद्रिय शेती करणे काळाची गरज आहे आहे आणि रासायनिक खताचा दुष्परिणाम तर आहेच पण त्यासाठी होणारा खर्च जास्त आहे त्यासाठी शेतकऱ्यांनी येत्या काळात सेंद्रिय शेती केली पाहिजे. सेंद्रिय शेतीला लागणारी खते घरीच तयार करता येतात त्यामुळे त्याला जास्त खर्च नाही आणि ते शरीराला हानिकारक नाही. मी नोकरी न करता माझ्या घरची १२ एकर शेती ही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून करत आहे. जर शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून जर सेंद्रिय शेती केली तर नोकरी करण्याची गरज नाही. रासायनिक खतांच्या दुष्परिणामामुळे अनेक रोगांना मानवी आरोग्य बळी पडत आहे. येणाऱ्या पिढीची असाध्य रोगांपासून दूर रहायचे असेल तर सेंद्रिय शेती हाच एकमेव पर्याय आहे.



## कीवत या शाळेतील विद्यार्थी घेणार डिजिटल शिक्षण

**भोर :** जिल्हा परिषद शाळेला नॅशनल ऍग्रो फाउंडेशन, चेन्नई या संस्थेच्या वतीने कॉम्पुटर, युपिएस, प्रिंटर, प्रोजेक्टर मोफत देण्यात आले.

दुर्गम डोंगरी भागातील जिल्हा परिषद शाळा किवत येथे सातवी पर्यंत शाळा असून आपल्या ग्रामीण भागातील शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकीय युगात डिजिटल शिक्षण पध्दत अवलंबण्यात येणार या करिता सरपंच तानाजी चंदनशिव, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष पंकज चंदनशिव यांना नॅशनल ऍग्रो फाउंडेशन, चेन्नई या संस्थेची माहिती मिळाल्यानंतर या संस्थेकडे आपल्या शाळेतील मुलांना डिजिटल शिक्षण मिळण्यासाठी पाठपुरावा करून या संस्थेच्या माध्यमातून कॉम्पुटर, युपिएस, प्रिंटर, प्रोजेक्टर मोफत देण्यात आले.

यावेळी सरपंच तानाजी चंदनशिव, शालेसमितीचे अध्यक्ष पंकज चंदनशिव, नॅशनल ऍग्रो फाउंडेशन, चेन्नई या संस्थेचे विभुते सर, मुख्याध्यापिका शैला कोठावळे, प्रमोद चिखले, आशा कवितके, प्रमिला वीर, राजेंद्र चंदनशिव, रघुनाथ चंदनशिव, अजय चंदनशिव, पुप्पा वरे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

आपल्या शाळेला कॉम्पुटर, युपिएस, प्रिंटर, प्रोजेक्टर मोफत देण्यात आले. त्यामुळे ग्रामीण भागातील शाळा असल्याने या शाळेत शिकणाऱ्या मुलाने डिजिटल शिक्षण मिळणार असल्याने आम्ही सर्वजण खुश आहोत.

यासाठी तानाजी चंदनशिव सरपंच व अध्यक्ष पंकज चंदनशिव यांनी प्रयत्नाला यश मिळाले. या मुळे शाळेचा पट संख्या वाढण्यास मदत नक्की होईल. असे मत लोकमत शी बोलताना शैला कोठावळे मुख्याध्यापिका यांनी व्यक्त केले.

## मुलांची सुसंस्कारीत पिढी हेच देशाचे भवितव्य : ननावरे



**खंडाळा :** शालेय विद्यार्थी हीच खरी देशाची संपत्ती आहे. शाळांमधून शिक्षणा बरोबर संस्कारक्षम मन घडविणे गरजेचे आहे. शिक्षकांसह मातापित्यांबद्दल मुलांच्या मनात आदर वाढणे आवश्यक आहे. मुलांचे आयुष्य घडावे यासाठी आईवडील काबाडकष्ट करतात तर शाळेत शिक्षक मेहनत घेतात याची जाणीव मुलांमध्ये कायम राहिली पाहिजे. मुलांची सुसंस्कारीत पिढी हेच देशाचे भवितव्य आहे असे मत इतिहास अभ्यासक दशरथ ननावरे यांनी व्यक्त केले.

पारगाव ता. खंडाळा येथील उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शुभचिंतन समारंभात 'शालेय जीवन आणि संस्कार' या विषयावर ते बोलत होते. यावेळी श्रीकृष्ण यादव, शैलजा जाधव, रत्ना खंडागळे, अंजुम पटेल, भारती काशीद, साधना भोसले, ताजुद्दीन मुल्ला, लक्ष्मी भंडलकर, संजय पांढरे यांसह प्रमुख उपस्थित होते. दशरथ ननावरे म्हणाले, आई ही मुलांची पहिली गुरु आहे तर शाळा ही मुलांची दुसरी आई असते. शालेय वयात मुलांवर योग्य संस्कार होणे गरजेचे आहे. केवळ संपत्तीचा मोह धरून जीवन जगणे योग्य नाही तर मुले हीच आपली संपत्ती मानून त्यांच्या घडण्यावर लक्ष केंद्रीत करायला हवे. मुलांनी आयुष्यात कितीही मोठे होऊ द्या मात्र आपल्या आई वडिलांना विसरता कामा नये. तुमचे जीवन घडावे यासाठी मातापिता काबाडकष्ट करतात. त्यांचे कष्ट सार्थकी लावणे हे मुलांचे कर्तव्य आहे. आई वडिलांचा आधार बनण्यासाठी कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याची ताकद ठेवा. जीवनात संकटं आपणाला अडवायला येत नाहीत तर ती घडवायला येतात. संकटातून मार्ग काढला की यशाची दारे खुली होतात. मुलांनी विद्यार्थीदशेतच ध्येय निश्चित केले पाहिजे. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी उत्तुंग ध्येय समोर ठेवले पाहिजे. जिद्द, चिकाटी आणि प्रयत्नातील सातत्य कायम ठेवून त्या ध्येयाचा पाठलाग करायला हवा. जीवनात हम खास यश मिळवायचे असेल तर आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी असे आवाहनही त्यांनी केले.


राजगड NEWS.Live

पुणे व सातारा जिल्ह्यातील नावाजलेले न्यूज पोर्टल राजगड न्यूज करिता

फ्रीलान्सर - मानसेवी व कमिशन तत्त्वावर नेमणे आहेत

- बातम्यांसोबत जाहिरात व्यवसाय करण्याची तयारी हवी, त्यापासून आकर्षक जाहिरात कमिशन मिळेल
- उमेदवार कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य नसावा.
- परिसरातील भौगोलिक, राजकीय, सामाजिक इ. विषयांची माहिती असावी.
- चांगला जनसंपर्क असावा.

खालील ठिकाणी नेमणे आहेत

पुणे जिल्हा तालुके
१ आंबेगाव २ इंदापूर ३ खेड ४ जुन्नर ५ दौंड ६ पुणे शहर ७ पुरंदर ८ बारामती ९ भोर १० मावळ ११ मुळशी १२ वेल्हे १३ शिरूर १४ हवेली

सातारा जिल्हा तालुके
१ सातारा २ कराड ३ वाई ४ महाबळेश्वर ५ फलटण ६ माण खटाव ७ कोरेगांव ८ पाटण ९ जावळी १० खंडाळा

पात्र उमेदवारांनी परिपूर्ण माहिती नमूद केलेले आपले अर्ज पुढील ईमेल आयडीवर सात दिवसांच्या आत पाठवावेत.

Email Id: rajgadnewslive@gmail.com

अर्जात शैक्षणिक पात्रता, मोबाईल नंबर,पत्ता,सध्या करत असलेले काम तसेच यापूर्वी केलेल्या कामाचा अनुभव नमूद असावा.

संपर्क : 7719020202/7770020202


## महाविद्यालयीन तरुणांकडून तरुणीचे अपहरण करून खून

**पुणे :** पुण्यात शिक्षणासाठी आलेल्या तरुणाईच्या गुन्हेगारी कृत्याने आज पुणे हादरलं. लातूरमधून शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या एका २२ वर्षीय तरुणीचं पुण्याच्या विमाननगर भागातून ९ लाखांच्या खंडणीसाठी अपहरण झालेल्या इंजिनिअरींगच्या तरुणीची हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

तिच्याच महाविद्यालयात शिकणारा मुख्य आरोपीच्या भूमिकेत असून, त्याने इतर दोन मित्रांच्या मदतीने तरुणीचे अपहरण आणि हत्या ही प्री-प्लॅनकरून केल्याचेही तपासात उघडकीस आले आहे. तिचे अपहरण केल्यानंतर आरोपींनी तिचा गळा दाबून खून केला.

**पोलिसांच्या तपासात मोठा खुलासा**

खुनानंतर पेट्रो टाकून तिला जाळले आणि तिचा मृतदेह पुणे-नगर रोडवरील अहमदनगर जिल्ह्यातील कामरगावच्या हद्दीत पुरून टाकला असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे, अशी माहिती परिमंडळ चारचे उपायुक्त विजयकुमार मगर यांनी दिली.

**विमाननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

भाग्यश्री सूर्यकांत सुडे (वय २२, रा. विमाननगर) असे हत्या झालेल्या मुलीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी तिचा मित्र व मुख्य आरोपी शिवम माधव फुलवळे (वय २१, रा. वाघोली), सुरेश शिवाजी इंदोरे (वय २३, मुंबई)



आणि सागर रमेश जाधव (वय २३, रा. लातुर) यांना अटक केली आहे. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात अपहरण, खून तसेच पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे.

**आरोपी आणि मृत तरुणी दोघेही चांगल्या घरातले**

भाग्यश्री मुळची लातूर जिल्ह्यातील हरंगुळ ब्रुद्रुक गावची होती. विमाननगर येथील एका महाविद्यालयात ती इंजिनिरींगच्या तिसऱ्या वर्षात शिकत होती. तर, मुख्य आरोपी शिवम हा नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील सकनूर येथील आहे. तोही याच महाविद्यालयात शिकत होता. त्यामुळे या दोघांची ओळख होती आणि चांगले मित्र देखील होते. शिवमचे वडिल शिक्षक आहेत. तोही चांगल्या घरातील असल्याचे समोर आले आहे.

### एकुलती एक भाग्यश्री..!

सुडे कुटूंबिय मुळचे लातुर जिल्ह्यातील आहे. वडिल लातूर जिल्ह्यातील मोठे शेतकरी आहेत. त्यांना भाग्यश्री व एक मुलगा आहे. भाग्यश्रीला मोठं शिक्षण देण्याचे त्यांचे स्वप्न होते. भाग्यश्रीही हुशार होती. परंतु, मित्रावर अतिविश्वास तिच्या जिवावर बेतला अन् तिचा घात झाला. अपहरण व खूनचा प्री प्लॅन भाग्यश्रीचे अपहरणकरून तिचा खून करण्याचा प्री प्लॅन आरोपींनी आधीच तयार केला होता. इतकच नाही तर त्यांनी खड्डा देखील २९ मार्च रोजीच खोदला होता, असे समोर आले आहे. त्यांना २९ मार्चलाच तिचे अपहरण करायचे होते. पण त्यादिवशी प्लॅन सक्सेस झाला नाही. त्यानंतर त्यांनी ३० मार्चला तिचे अपहरणकरून खून केला.

**आरोपींकडून गाडीमध्येच गळा दाबून खून**

दरम्यान, प्री प्लॅननुसार आरोपींनी ३० मार्च रोजी झूम कारवरून एक कार भाड्याने घेतली. तसेच, भाग्यश्रीला रात्री भेटायला म्हणून शिवम याने बोलावले. ती आल्यानंतर तिचे कारमधून अपहरण केले. मोबाईल काढून घेत त्याचा पिनही घेतला. तसेच तिचे पाय व तोंड चिकटपट्टीने बांधले. तिचे अपहरण केल्यानंतर आरोपींनी गाडीमध्येच तिचा गळा दाबून खून केला. खून केल्यानंतर आरोपींनी कार पुणे-नगर रस्त्याने अहमदनगर जिल्ह्यातील कामरगाव येथे नेली. त्याठिकाणी मोकळ्या जागेत एक खड्डा खोदला आणि खड्यात तिचा मृतदेह टाकून तो पेट्रोल टाकून जाळला. मृतदेह जाळल्यानंतर त्याच खड्यात तो पुरला देखील.

आईशी आरोपींचे चॅटींग. भाग्यश्रीचा मोबाईल आरोपींकडे होता. आरोपी आईचा मॅसेज आल्यानंतर तिच्याशी बोलत होते. दोन दिवसांनी म्हणजे, २ एप्रिल रोजी आरोपींनी तिच्या कुटूंबियांशी संपर्क साधत त्यांना ९ लाखांची खंडणी मागितली. तसेच, पैसे न दिल्यास तिचे तुकडे करू अशीही धमकी दिली. त्यानंतर कुटूंबाने पोलिसांकडे धाव घेत याबाबत तक्रार दिली. विमानतळ पोलिसांसह गुन्हे शाखेकडून भाग्यश्रीचा शोध सुरू केला होता. तिचे लोकेशन वेगवेगळे होत होते, त्यानूसार पोलीस शोध घेत होते.

अन् तिने आईला वाढदिवसाला जात असल्याचे सांगितले भाग्यश्रीने ३० मार्च रोजी आईला फोनकरून मी, मैत्रिणीच्या वाढदिवसासाठी विमाननगरमधील फिनिक्स मॉलमध्ये जाणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर ३१ मार्च रोजी तिच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा मोबाइल बंद असल्याचे लक्षात आले होते.